# स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा सामाजिक दर्जा

**भाग्यश्री पांडुरंग पानढवळे*** 
*संशोधक*
*डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद*

**डॉ. एन. एस. शिंदे****
*समाजशास्त्र विभागप्रमुख व मार्गदर्शक*
*राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना*

प्रस्तावना :

सरकारच्या आरक्षणाच्या धोरणामुळे नोकरी करणाऱ्या माहीलाचे प्रमाण वाढत असलेले दिसून येत आहे त्यामुळे त्यांचा विकासही झपाट्याने होत असलेला दिसून येत आहे. म्हणून कलेक्टर, डॉक्टर. प्राध्यापक, सरकारी तसेच निमसरकारी क्षेत्रात सुद्धा स्त्रीया मोठ्या प्रमाणात दिसतात. स्थानिक स्वराज्य संस्थेत सुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) सारख्या सर्वोच्च पदावर आज ती दिसून येत आहे. आणि पुरुष प्रधान संस्कृतीला लाजविल अशा प्रकारचे कार्ये करत आहे. महिला या पुरुषा पेक्षा कुठल्याही क्षेत्रात कमी नाहीत हे त्यांनी आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. स्त्रीयांच्या नेतृत्वामुळे बालविवाह प्रतिबंध, दारूबंदी, हुंडबंदी, स्त्रीया वरील अत्याचार अशा अनेक समस्या सोडवण्याचे धाडस करून आमुलाग्र बदल केले आहे.

लोकशाहीत विकेंद्रीत नियोजन व्यवस्था निर्माण व्हावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेला लोकशाहीचा मूळ आधार म्हटले जाते. स्थानिक स्वराज्य संस्था ही सामान्य जनतेच्या दैनदिन जीवनात निम्न स्तरावर काम करणारी संस्था आहे. म्हणून सर्वसामान्य जनतेला ती अधिक जवळची वाटते. सर्वसामान्य जनतेच्या कल्याणसाठी योजनाची पूर्तता करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन या मधील मध्यस्थाची भूमिका स्थानिक स्वराज्य संस्था करते म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्व वाढलेले आहे स्थानिक स्वराज्य संस्था ही लोकांच्या दैनदिन गरजा आणि विकास समाजाचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी आणि सामाजिक शांततेसाठी ही एक शासकीय यंत्रणा आहे. लोकाच्या गरजा आणि त्यांचा सामाजिक विकासाच्या दृष्टिकोणातून ही यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. यातूनच मानवाचा सामाजिक विकास होत असतो. कारण मानव हा समजशील प्राणी असल्यामुळे तो समाजातच राहणे पसंत करतो आणि आचार-विचार सुद्धा समाजातूनच ग्रहण करत असतो. म्हणून समाजात शासनाने सुव्यवस्था करणे गरजेचे आहे. उदा- पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, स्वछता, संरक्षण, शाळा, दवाखाने, वाहतूक, करमणुकीच्या सुविधा इत्यादी सेवा पुरविण्याचे काम या यंत्रणा करत असताना दिसून येतात. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे. आणि तीच आधुनिक काळाची गरज आहे. असे असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थेला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. कारण प्राचीन काळापासूनच स्थानिक स्वराज्य संस्था अस्तीत्वात होत्या त्याचा इतिहास हा गौरवशाली आहे. कल्याणकरी राज्याची निर्मिती करण्यासाठी स्थानिक पातळीवर शासनाच्या कार्यात सहभागी होऊन सर्वसामान्य जनतेपर्यंत त्यांचे लाभ पोहचवणारी यंत्रणा म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेला महत्व प्राप्त झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे राष्ट्रीय कार्यक्रमाची अमलबजावणी करणारी यंत्रणा निर्माण झाली. या यंत्रणेत स्थानिक जनतेला लोकशाही प्रती प्रशिक्षित, राजकीय प्रक्रियेत जागरूक आणि प्रशासन व्यवस्थेत ही सामील करून घेतले आहे. जगात अनेक राष्ट्रांनी राज्यकरभारच्या सुविधेसाठी आणि स्थानिक जनतेच्या कल्याणसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्विकार केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रीया या राजकीय तसेच प्रशासकीय अशा दोन्ही विभागात दिसून येतात. राजकीय क्षेत्रात ३०% आरक्षणावरून आता ५०%करण्यात आले आहे. तर प्रशासकीय क्षेत्रात ३३% आरक्षण आहे. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना नेतृत्वाची संधी मिळाली आहे. या आरक्षणामुळे समजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत महिलांचे सबलीकरण होण्यास मदत झाली आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सहेतुक नमूनानिवड पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. यामध्ये प्राथमिक तथ्य संकलनात प्रशांनावली, मुलाखत, निरीक्षण या पद्धतीचा ऊपयोग करून माहिती संकलित करण्यात आली.

द्वितीय तथ्य संकलांनामध्ये पुस्तक, लेख, मासिके, प्रकाशित आणि अप्रकाशित प्रबंध, इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील ८ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोकरी करणाऱ्या २६० स्त्रियांचा समावेश करून त्यांचा कौटुंबिकए आर्थिक आणि कार्यालयीन दर्जा विषयी संशोधन करण्यात आले आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

- स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कौटुंबिक दर्जा जाणून घेणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आर्थिक दर्जा जाणून घेणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा कार्यालयीन दर्जा जाणून घेणे.

**कौटुंबिक दर्जा :**

मानव हा सामाजिक प्राणी आहे. समाजामध्ये तो एकटा राहू शकत नाही. तो एकत्रित पध्दतीने राहणारा बुध्दिमान प्राणी आहे. जस –जसा समाज विकसित होत गेला.तस – तसे मानवामध्ये आमुलाग्र बदल होत गेले, व आधुनिक काळातही अनेक बदल होताना दिसून येतात. पूर्वीच्या काळी मानव शेती व्यवसाय करत असे त्यासाठी मनुष्य बळाची गरज होती त्यामुळे संयुक्त कुटुंब पध्दती अस्तीत्वात होतो परंतु कालांतराने नोकरीच्या किंवा व्यवसायाच्या निमित्ताने कुटुंबातील एक – एक व्यक्ति बाहेर पडू लागली आणि संयुक्त कुटुंब पध्दतीचा लोप पाऊ लागली आणि विभक्त कुटुंब पध्दती अस्तीत्वात आली. कुटुंबाची व्याख्या करताना डॉ. मुजूमदार यांच्या मते : “कुटुंब हा अशा व्यक्तींचा समूह आहे की, जे एकाच घरात राहतात. जे परस्परांचे संबधी असतात व स्थान, हीत आणि परस्परविषयी असणारी कर्तव्याची जाणीव या आधारावर समानतेची भावना ठेवतात.”[१] डॉ. मुजूमदार यांनी समान निवासस्थान व रक्तसंबध या व्यतिरिक्त परस्पर अधिकार व कर्तव्याच्या आधारावर समानतेची जाणीव या मानसिक घटकास विशेष महत्व दिलेले आहे.

**उत्तरदात्यांना कुटुंबातील निर्णय घेताना मत दर्शवणारा तक्ता :**

भारतीय समाजराचनेनुसार स्त्रियांना कुटुंबात दुय्यम स्थान होते परंतु हळू-हळू स्त्रियांचा दर्जा उंचावलेला दिसून येत आहे. स्त्रिया नोकरी सांभाळून कौटुंबिक कामेए वैयक्तिक आरोग्य, मुले, घर, नातेवाईक, वैयक्तिक आणि सामाजिक जीवन या आणि अशा प्रकारची अनेक कर्तव्य नोकरी करणाऱ्या स्त्रिया सांभाळताना दिसून येतात.[२] समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे परिस्थितीत हळूहळू सुधारणा झालेली दिसून येत आहे. चार भिंतीच्या आत दाबलेला आवाज बाहेर यायला लागला.[३] सामाजिक जीवनाचा बरा – वाईट अनुभव घेऊन स्त्रियां अधिक प्रगल्भ आणि सुजन बनत आहेत आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढत आहे. स्त्रियांच्या विचारांचा देखील सन्मान केला जात आहे. आज महत्वाच्या निर्णय प्रक्रियेत स्त्रीयांचे मत घेतले जाते.[४]

***तक्ता क्र.१.१***

***कुटुंबातील निर्णय घेताना उत्तरदात्यांचे मत दर्शवणारा तक्ता***

| अ. क्र. | कुटुंबात निर्णय घेताना आपले मत विचारले जाते का | उत्तरदात्यांचे एकुण प्रमाण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २३९ | ९१.९ % |
| २ | नाही | २१ | ८.१ % |
| | एकूण | २६० | १०० % |

तक्ता क्र १.१ मध्ये मिळालेल्या माहितीचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे. कुटुंबात कुठलाही निर्णय घेताना आजच्या स्त्रियांना विचारले जाते त्यांच्याकडे सुध्दा बौध्दिक क्षमता असते हे आता सर्वांनी मान्य केलेले दिसून येते. म्हणून कुटुंबात निर्णय घेताना त्यांचे मत विचारले जाते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण २३९ (९१.९%) एवढे दिसून येते. याचाच अर्थ असा आहे की, नोकरीमुळे स्त्रियांना कुटुंबात मानाचे स्थान असलेले दिसून येते.

**१.२ उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा दर्शवणारा तक्ता** :

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना खरच आर्थिक स्वातंत्र्य आहे का ? का नोकरी करून बाहेरची पण चाकरी करायची आणि घरी नवऱ्याची पण चाकरी करायची आणि तेही विनामोबादला याला काय म्हणावे मानवाला दिलेली वागणूक म्हणतात तर याचे उत्तर नाही असे असेल. परंतु स्त्रिया नोकरी करायला लागल्यापासून थोड्याफार प्रमाणात का होईना पुरुष स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य देताना दिसून येत आहे. पुरुष नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्या प्रकारचे आर्थिक स्वातंत्र्य देतात हे जाणून घेण्यासाठी उत्तरदात्याना कांही पर्याय देण्यात आले आहेत. ते तक्ता क्र. १.२ मध्ये पाहू.

***तक्ता क्र. १.२***

***उत्तरदात्यांचे आर्थिक स्वातंत्र्य दर्शवणारा तक्ता***

| अ. क्र. | उत्तरदात्यांचे आर्थिक स्वातंत्र्य | उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अंशतः स्वातंत्र्य | ४६ | १७.७ % |
| २ | संपूर्ण स्वातंत्र्य | १३५ | ५१.९ % |
| ३ | स्वातंत्र्य आहे परंतु आधी कल्पना द्यावी लागते | ६२ | २३.९ % |
| ४ | कुठलेही आर्थिक स्वातंत्र्य नाही | १७ | ६.५ % |
| | एकूण | २६० | १०० % |

तक्ता क्र. १.२ मध्ये मिळालेल्या माहितीचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे. छोट्या – छोट्या वस्तु घेण्याचे स्वातंत्र्य (अंशतः स्वतंत्र्य) असणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण ४६ (१७.७%) एवढे दिसून आले. छोट्याए मोठ्या वस्तु घेण्याचे स्वातंत्र्य (संपूर्ण स्वतंत्र्य) असणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण १३५ (५१.९%) एवढे दिसून आले. तर स्वातंत्र्य आहे परंतु आधी कल्पना द्यावी लागते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण ६२ (२३.९%) एवढे दिसून आले. संपूर्ण आर्थिक स्वातंत्र्य असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्यामुळे स्त्रियांचा आर्थिक दर्जा अतिशय उत्तम असल्याचे दिसून येते.

**१.३ उत्तरदात्यांच्या कार्यालयीन दर्जा दर्शवणारा तक्ता** :

व्यक्तीची समाजातील एक विशिष्ट स्थिती म्हणजे दर्जा होय. दर्जा म्हणजे स्थान दर्जा ही सापेक्षए परिवर्तनीय व तुलनात्मक स्वरूपाची संकल्पना आहे. समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला एक विशिष्ट स्थान असते ती त्या समाजात विशिष्ट स्थान भूषवीत असते. सर्व स्थाने वेगवेगळी असतात ही सर्व स्थाने व्यक्तीला त्या – त्या समाजाच्या नियमनांच्या आधारावर मिळालेली असतात. या सर्व स्थानांना 'दर्जा' असे म्हणतात.[५] कामाच्या ठिकाणी जर अधिकाऱ्याने जर कामगाराच्या कामाची स्तुती किंवा प्रशंसा केली तर तो कामगार दुप्पट जोमाने काम करतो. म्हूणून प्रस्तुत संशोधनात स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरी करणाऱ्या उत्तरदात्यांच्या कामाची दखल वरिष्ठ अधिकारी घेतात का किंवा दखल घेत असतील तर ती कशा प्रकारे घेतात. संशोधना वरून तक्ता क्र. १.३ मध्ये निष्कर्ष माडलेले आहेत.

***तक्ता क्र. १.३***

| अ. क्र. | उत्तरदात्यांचे वरिष्ठ अधिकारी चांगल्या कामाची दखल घेण्याचे प्रमाण | उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कामाची सर्वांसमोर प्रशंसा केली जाते | ११६ | ४४.६ % |
| २ | महत्वाच्या कामाची जबाबदारी टाकली जाते | ११४ | ४३.९ % |
| ३ | एखाद्या पुरस्कारासाठी शिफारस केली जाते | २३ | ८.८ % |
| ४ | चांगल्या कामाची दखल घेतली जात नाही | ०७ | २.७ % |
| | एकूण | २६० | १०० % |

तक्ता क्र १.३ मध्ये मिळालेल्या माहितीचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे. उत्तरदात्या स्त्रियांचे वरिष्ठ अधिकारी चांगल्या कामाची दखल घेतात ती कशा प्रकारे घेतात. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची चांगल्या कामाची सर्वांसमोर प्रशंसा केली जाते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण ११६ (४४.६%) एवढे दिसून आले. महत्वाच्या कामाची जबाबदारी टाकली जाते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण ११४ (४३.९%) एवढे दिसून आले. तर एखाद्या पुरस्कारासाठी शिफारस केली जाते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण २३ (८.८%) एवढे दिसून आले. तर क चांगल्या कामाची दाखल घेतली जात नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण ०७ (२.७%) एवढे दिसून आले. यावरूनच स्त्रियांना कार्यालयात केलेल्या कामाचा दिलेला दर्जा दिसून येतो.

**निष्कर्ष :**

- आजची स्त्रि शिक्षण आणि नोकरीमुळे आत्मनिर्भर झाली आहे. कायद्याचे संरक्षण, स्त्रियांना दिले गेलेले स्वातंत्र्य, उच्च शिक्षण, जगतिकीकरण आणि विभक्त कुटुंब पध्दती यामुळे आज स्त्रियांना नोकरी करण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती झालेली आहे.
- नोकरी करणाऱ्या स्त्रियांना स्वतः साठी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यांना पाहिजे त्या वस्तु घेण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु कुठलीही वस्तु घेताना घरच्यांना किमान त्याची कल्पना द्यावी अशी अपेक्षा असते.
- नोकरी पूर्वी समाजात एक घरकाम करणारी गृहिणी एवढीच ओळख असते परंतु नोकरीनंतर पैसे कमावणारी अशी वेगळीच प्रतिमा समाजातच नव्हे तर घरात सुद्धा  निर्माण होते.
- पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्यालयीन कार्य करणारी कर्मचारी म्हणून अधिकारी सुद्धा स्त्रियांना मानाचे स्थान देतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- डॉ. सुमन लोमटे (१९९९) : नाते व्यवस्था, स्त्री दर्जा व भूमिका, सरस्वती प्रिंटींग प्रेस, औरंगाबाद, पृ. क्र. ०५.
- मित्तल दर्जी (२०१६) : “The challenges faced by Indian working women to balance professional and social life in 21st century”, Indian Journal of Technical Education (IJTE) p.no.- 60 Gujarat.
- रोडे पुष्पा (२००९) : महिलांसाठी आधार कायद्याचा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. क्र. ०३.
- गोडसे जयश्री : स्त्री अभ्यास : विविध पैलू, सानिया प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. ८९.
- डॉ काचोळे दा. धो. (२००८) : “उपोद्घातरूप समाजशास्त्र”, कैलाश पब्लिकेश, औरंगाबाद, पृ. क्र. १३८